## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २० (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी कार्यक्रमांतर्गत विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र प्रशाळेतील डॉ. प्रशांत सोनवणे यांचे 'आधुनिक जीवन आणि योगाची शाश्वतता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमप्रसंगी प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी 'आधुनिक जीवन आणि योगाची शाश्वतता' याविषयी पीपीटीने प्रात्यक्षिक करत डॉ. प्रशांत सोनवणे म्हणाले की, गीतेत सांगितलेल्या कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तीयोग, ध्यानयोग या योगांचा आधार घेऊन महर्षी पतंजली यांनी योगाच्या संकल्पना मांडत अष्टांगयोग विस्तृतपणे विवेचन केला आहे. ताणतणाव, नैराश्य, स्पर्धा, करियर यामुळे बीपी, मधुमेह अंगदुखी ही सध्याची आधुनिक जीवनशैली झाली आहे. कारण सामाजिक क्षेत्रात वावरत असताना अशा अनेक समस्यांना माणूस दररोज सामोरा जात असतो. या सर्व गोष्टींवर मात करण्यासाठी तसेच आरोग्यपूर्ण जीवन जगण्याच्या पद्धतीचा अवलंब म्हणजे योग असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय मनोगतातून प्रशाळेचे संचालक माननीय प्रा. म. सु. पगारे म्हणाले की, योगाने जीवनाचे नियोजन करण्यामुळे मन आणि शरीर दोन्हीही स्वास्थ्यवर्धक व शांततापूर्ण बनल्यामुळे आपोआपच व्याधी दूर होतात, सकरात्मकता प्राप्त होते.

याप्रसंगी प्रशाळेतील मराठी विषयाचे प्राध्यापक डॉ. दीपक खरात, डॉ. भारती सोनवणे, इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ. सुदर्शन भवरे, कृष्णा संदानशिव, हिंदी विषयाच्या शिक्षक सहयोगी पल्लवी बारी, संशोधक विद्यार्थी श्री. खेमराज पाटील, श्री. महेश सूर्यवंशी यांसह शिक्षकेतर कर्मचारी चंद्रकांत बिऱ्हाडे, मनीष सोनार हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपक खरात यांनी केले.

**बातमी २**

जळगाव दि. २० (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षा अंतर्गत विद्यापीठातील व्यवस्थापन प्रशाळेच्या विद्यार्थ्यांसाठी लेन्स कार्ट सोल्युशन लिमिटेड मुंबई, या नामांकित कंपनी तर्फे बीबीए, बीएस्सी व बीकॉम च्या विद्यार्थ्यांची परीसर मुलाखत दृकश्राव्य हॉल येथे दि. 18 मार्च 2026 रोजी आयोजित करण्यात आली होती. यात विद्यापीठातील 14 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. परीसर मुलाखत घेण्यासाठी कंपनीचे प्रतिनीधी जतीनकुमार यादव व विशाल शर्मा होते.

या परीसर मुलाखतीमध्ये एकूण 25 विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात आली होती. त्यात तेजस पाटील, ओम जावरे, दिव्या देवरे, दिया पंजाबी, विवेक पाटील, साक्षी पवार, केतन राठोर, रिटा भांडारकर, तुषार निकम, मयुर पाटील, मनिष चौधरी, रोहित घोडके, केतन रविंद्र पाटील, चौताली बारी हया विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली व त्यांना वार्षिक वेतन 3.00 लाख इतके देण्यात आले आहे.

केंद्रिय प्रशिक्षण आणि नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल पाटील, उपसमन्वयक प्रा. रामेश्वर चव्हाण व प्लेसमेंट ऑफिसर श्रीमती सोनाली दायमा यांनी परिसर मुलाखतीचे व्यवस्थापन केले होते. या विद्यार्थ्यांचे कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील व स्कूल ऑफ मॅनेजमेंट स्टडिजच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत

.........................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २० एप्रिल, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता